



www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–19 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 12 जानेवारी 2025 ■ किंमत 2 रूपये, पाने –4

## राज्यातील २९ महानगरपालिका निवडणूक क्षेत्रात १५ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूम ीवर संबंधित मतदान क्षेत्रात १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे.

अधिसूचना सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निम शासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे इत्यादींच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील मतदारसंघाबाहेर कामानिमित्त असलेल्या म तदारांनाही लागू राहणार आहे.

महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्रशासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका व तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगरपालिकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण–डोंबिवली, भिवंडी–निजामपूर, मीरा–भाईदर, वसई–विरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरी–चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली–मिरज–कुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड–वाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे.

दरम्यान, नागरिकांनी आपल्या मतदान केंद्राची माहिती आधीच तपासून लोकशाहीचा उत्सव असलेल्या मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.






# बहिणींच्या तोंडचं पाणी पाळवणाऱ्यांचा बंदोबस्त करण्याची ही निवडणूक –उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## स्थगिती सरकारकडून संभाजीनगरचा विकास स्थगित; शिंदेंचा ठाकरेंवर निशाणा

**दिनेश परदेशी – छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्यातील २९ महापालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. मराठवाड्यातील प्रमुख शहर असलेल्या छत्रपती संभाजीनगर महापालिकेवर मागील २५ वर्षांपासून शिवसेना–भाजप युतीची सत्ता राहिली आहे. राज्यात सत्तेत असलेले भाजप आणि शिंदेंची शिवसेना हे दोन्ही पक्ष यंदाच्या निवडणुकीत मात्र शहरात स्वतंत्रपणे लढत आहेत. जागा वाटपावरुन दोन्ही पक्षांच्या स्थानिक नेत्यांम ध्ये एकमत होऊ शकले नाही आणि युती दुभंगली. यामुळे संभाजीनगरमध्ये तिरंगी–चौरंगी लढत होत आहे. शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी आलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिस्पर्धी भाजपवर टीका न करता उद्धव ठाकरेंवरच सर्वाधिक निशाणा साधला.

एकनाथ शिंदे म्हणाले की, संभाजीनगरमधील बहिणींच्या तोंडचं पाणी पाळवणाऱ्यांचा बंदोबस्त करण्याची ही निवडणूक आहे. आम्ही लाडक्या बहिणींसाठी सुरु केलेली योजना बंद केली जाणार नाही. उलट आता लाडक्या बहिणींना त्यांच्या सहीने पैसे काढण्याचा अधिकार दिला आहे. आमच्या सरकारने मुलींचं उच्च शिक्षण मोफत केलं आहे. घरातील छोट्या छोट्या समस्यांना महिला भगिनींना सामोरे जावे लागते. त्यांच्यासाठी लाडकी बहिण योजनेचा मोठा फायदा होत आहे. ही योजना बंद करण्यासाठी अनेक लोक कोर्टात गेले. खोडा घालण्याचा प्रयत्न केला. त्यांना लाडक्या बहिणींनी २३२ नंबरचा जोडा दाखवला. त्यांना त्यांची जागा दाखवली, त्यांना घरी बसवलं. ही तुमच्याम ध्ये ताकद आहे, असे सांगत महापालिकेत शिवसेनेच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन एकनाथ शिंदेंनी केले.

शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची नुकतीच शहरात सभा झाली. त्यांनी दिलेल्या आश्वासनांवरुन टीका करताना शिंदे म्हणाले की, आता घराबाहेर पडायला लागले आहे. पण यांनी फक्त फेसबुक लाईव्ह केले. आमचे सरकार फेसबुक लाईव्ह नाही, फेस टू फेस कारभार झाला पाहिजे यावर भर देणारे आहे. संभाजीनगरला पाणी मिळेल, हा शब्द देतो. शहराच्या तोंडचं पाणी पळवणाऱ्यांचा बंदोबस्त करा, असं आवाहन त्यांनी केलं.

**लाडक्या बहिणींनावर शिंदेंचा विश्वास, म्हणाले:**

ठाकरेंचे नाव न घेता एकनाथ शिंदे म्हणाले की, मी गावी गेलो तरी पोटात दुखतं. मी गरीबी पाहिली आहे. माझ्या आईची, पत्नीची तगमग पाहिली आहे. महिनाभर घर कसं चालवायचं यासाठी त्यांची होणारी चिंता पाहिलं आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर ठरवलं की लाडक्या बहिणी, मातांसाठी काही तरी करायचे. त्यातूनच लाडकी बहीण योजना सुरु केली. योजना बंद करण्यासाठी अनेक लोक कोर्टात गेले. खोडा घालण्याचा प्रयत्न केला. त्यांना लाडक्या बहिणींनी असा २३२ नंबरचा जोडा दाखवला. त्यांना त्यांची जागा दाखवली, त्यांना घरी बसवलं. ही तुमच्यामध्ये ताकद आहे, असे शिंदे म्हणाले.शिवसेना पक्षाच्या वतीने आयोजित विराट प्रचारसभेत बोलताना पालकमंत्री संजय शिरसाट यांनी स्पष्ट भूमिका मांडली की, नामांतरानंतरच्या या पहिल्याच महापालिका निवडणुकीत छत्रपती संभाजीनगरचा पहिला म हापौर हा शिवसेनेचाच असलाच पाहिजे. खोट्या हिंदुत्वाचा मुखवटा घालून शहरावर डोळा ठेवणाऱ्यांना हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा खरा हिंदुत्ववादी बाणा दाखवण्याची हीच वेळ आहे. इतिहास साक्षी आहे – छत्रपती संभाजी महाराजांचा घात बाहेरच्यांनी नव्हे, तर घरभेद्यांनी केला होता. आजही असेच घरभेदी समाजात सक्रिय आहेत, त्यांना ओळखून वेळीच दूर ठेवणे गरजेचे आहे. छत्रपती संभाजीनगर ही शिवसेनेची संघर्षभूमी आहे. मुंबई–ठाण्यानंतर शिवसेनेला सर्वाधिक बळ याच शहराने दिले. बाळासाहेब ठाकरे यांचे या शहरावर आणि या शहराचे शिवसेनेवर जीवापाड प्रेम होते. म्हणूनच यंदा महापालिकेवर शिवसेनेचाच भगवा फडकणार, हा निर्धार आहे. सन्माननीय मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली छत्रपती संभाजीनगरचा सर्वांगीण विकास निश्चित असून, यांनी या पवित्र नामांतराला विरोध केला, त्यांना याच निवडणुकीत जनताच योग्य उत्तर देईल.



### पतंग कटली, आता त्यांची वाट लागली

एकनाथ शिंदे यांच्या भाषणात आकाशात उडणारा एक पतंग कटून खाली आला. त्याचा उल्लेख करीत शिंदे यांनी पतंग कटली, आता त्यांची वाट लागली, असे सांगत एमआयएमच्या ओवैसी आणि इम्तियाज जलील यांच्यावरही जोरदार टीका केली. ओवैसीच्या पार्टीला गाडून टाकण्याची संधी या निवडणुकीत तुमच्या हातात आली आहे. त्यांना गाडून टाका, असे आवाहन शिंदे यांनी केले. आधी काँग्रेसने आणि नंतर स्थगिती सरकारने या शहराचा विकास रोखला. महाविकास आघाडीने मुंबईप्रमाणेच संभाजीनगरातही भ्रष्टाचाराची पेरणी केली. त्यामुळे पाणीप्रश्न सुटला नाही, असा आरोपही शिंदे यांनी केला.

### शिवसेनेचाच महापौर बसणार

छत्रपती संभाजीनगर महापालिकेत शिवसेनेचाच महापौर बसेल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला. संभाजीनगरात शिवसेना स्वबळावर लढते आहे, पण आपले शिवसैनिक लढाऊ आहेत. इथे समोर जमलेली गर्दी पाहून मला खात्री पटली आहे की, इथे शिवसेनेचाच महौपार बसल्याशिवाय राहणार नाही, असे शिंदे म्हणाले.

# हिंदूंमध्ये फूट पाडण्यासाठीच ठाकरे बंधू एकत्र–मंत्री नितेश राणे

मुंबई : हिंदूंमध्ये फूट पाडण्यासाठी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. ठाकरे बंधू मराठीच्या नावावर राजकारण करत आहेत. आदित्य आणि अमित ठाकरे यांना जेवढी मराठी बोलता येत नाही, त्यापेक्षा अधिक चांगली मराठी आपल्या उत्तर भारतीय हिंदू बांधव आणि त्यांची मुले बोलतात. मराठी सक्ती गरीब उत्तर भारतीय लोकांवरच का केली जाते असा सवाल करत मराठीची सक्ती करायचीच असेल, तर मग ती मदरशांमध्येही व्हायला पाहिजे, मदरशांमध्येही मराठी भाषा शिकवली पाहिजे सांगत मत्सव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी ठाकरे बंधूंच्या मराठी मुद्याचा समाचार घेतला. ठाकरे बंधूंना मत म्हणजे पाकिस्तानात बसलेल्या त्यांच्या अब्बाला मत असेही त्यांनी यावेळी सांगितले.

गोरेगाव गोकूळधाममधील भाजप –शिवसेना महायुतीच्या उमेदवार प्रीती सातम यांच्या प्रचारासाठी गोरेगाव पूर्व येथील कन्यापाडा येथील चौकसभेत ते बोलत होते. कन्यापाडा परिसरात त्यांचे स्वागत 'जय श्री राम' घोषणांनी झाले. कन्यापाडा ते व्यासपीठापर्यंतचा परिसर जय जय श्रीरामाच्या नामघोषांनी दणाणून गेला होता. हे हिंदू राष्ट्र, हिंदुत्व विचारधारेचे राष्ट्र आहे, हा महाराष्ट्र, ही मुंबई हिंदुत्वाच्या विचारधारेची आहे. म हाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे आपल्या हिंदू समाजाचे आहेत, त्यामुळे हिंदू समाजाचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. हिंदूंकडे जर कोणी वाकड्या नजरेने पाहत असेल तर त्यांना जशास तसे उत्तर देण्यात आमची पीएचडी झालेली आहे. या हिंदू राज्यात, हिंदू समाजाकडे वाईट नजरेने पाहणाऱ्यांना आम्ही खपवून घेणार नाही, असे राणे म्हणाले. निवडणूक असो वा नसो, काही चुकीचा त्रास जर आमच्या हिंदूंना देणार असाल, तर जसे आज निवडणुकीसाठी मत मागायला आलो आहे, तसेच पुढील वेळेला सांगणारही नाही आणि अशा जागेवर येईन की शुक्रवारचाही त्रास होईल. हा सर्व प्रकार माझ्या ५२ वॉर्डांत करण्याची हिंमत करू नका. ही आमची सातम बहीण एकटी नाही, तिच्या मागे आम्ही आहोत, हे आज मी इथून सांगून जात आहे.

आपल्याला कोणतीही चिंता करण्याची गरज नाही. आज निवडणूक असू द्या किंवा नसू द्या आपल्याला हिंदू बनून जे करायचे ते करा, जो सण आपल्याला करायचा तो जोरात साजरा करा. हे आज मी आपल्याला सांगून जात आहे.